5/23/2/18

# University of Mumbai

पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष,
परीक्षा विभाग/निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई – ४०० ०९८.

क्र.परीक्षा/पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष/९८६८/२०१७

परिपत्रक :–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक, यांना कळविण्यात येते की, द्वितीय सत्र–२०१७ मध्ये घेण्यात येत असलेल्या परीक्षांसाठीचे पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रतींसाठीचे अर्ज संबंधित परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यापासुन २० दिवसाच्या आत सॉफ्ट कॉपी(सी.डी) व हार्ड कॉपी(पारंपरिक अर्ज) स्वरूपात परिपूर्णरित्या भरून संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या सहीशिक्क्यानिशी विहित शुल्कासह परीक्षा विभागातील पुर्नमुल्यांकन व छायांकित प्रत कक्ष, रूम नं. ४७, दुसरा मजला, येथे स. ११.०० ते दु. २.३० या कालावधीत हस्तेपोच सादर करावेत ही विनंती.

अर्ज सादर करण्यासाठीच्या विशेष महत्वाच्या सुचना:–

१) पुर्नमुल्याकंनाच्या अर्जासाठी स्वतंत्र सी.डी व पत्र तसेच छायांकित प्रतीच्या अर्जासाठी स्वतंत्र सी. डी व पत्र सादर करावीत.

२) सदर दोन्ही बाबी एकाच सी.डी. व त्यासाठी एकच पत्र असल्यास अर्ज स्विकारले जाणार नाही.

३) अर्ज परिपूर्णरित्या व अचूक भरलेले आहे याची खात्री करून घ्यावी. अर्ज अपूर्ण भरलेला व अर्जात चूकीची माहिती असल्यास व यामुळे भविष्यात काही बाबी उद्‌भवल्यास त्यास संबंधित महाविद्यालय जबाबदार राहील.

४) अर्ज स्विकारण्याची मुदत संपल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

५) शुल्काचा तपशील:–

| | खुल्या प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी | राखीव प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी (Those who gets concession is tutuion fees and other fees) |
|---|---|---|
| पुर्नमुल्यांकन:– | रू. २५०/– | रू. १२५/– |
| छायांकित प्रत:– | रू. ५०/– | रू. २५/– |

उपरोक्त बाबीची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी ही विनंती

मुंबई – ४०००९८
दि. २३ नोव्हेंबर, २०१७.

प्रा. (डॉ.) अर्जुन घाटुळे
प्र. संचालक,
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

अ. प्रत:–

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/प्रमुख, विद्यापीठाशी संलग्नित/संचालित महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त संस्थाचे संचालक/प्रमुख, दुर व मुक्त अध्ययन संस्थेचे प्राध्यापक नि संचालक, विद्यापीठाच्या रत्नागिरी व ठाणे उपकेद्रांचे समन्वयक/संचालक.

ब. प्रत माहितीस्तव व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित:–

१. संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, मुख्य लेखापाल वित्त व लेखा विभाग, परीक्षा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

क. प्रत माहितीसाठी अग्रेषित:–

१. मा. संचालक विद्यार्थी कल्याण विभाग
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव
३. मा. प्र. कुलगुरू यांचे स्विय सहायक
४. मा. कुलसचिव व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे स्विय सहायक